22 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# विद्यार्थ्यांना मिळणार डिजिटल पदवी

## शिवाजी विद्यापीठाचा 'सीडीएसएल'समवेत करार; नॅशनल अॅकॅडेमिक डिपॉझिटरीमध्ये होणार समाविष्ट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई म्हणजे 'सीडीएसएल'सारख्या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने होईल, असा विश्वास प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी आज येथे व्यक्त केला. यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात आज शिवाजी विद्यापीठ आणि सीडीएलएस यांच्यादरम्यान 'नॅशनल अॅकॅडेमिक डिपॉझिटरी' मध्ये समाविष्ट होण्यासंदर्भात सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, केंद्र सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनच्या आवाहनाला प्रतिसादादाखल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पुढाकारातून आजचा सामंजस्य करार साकार होतो आहे. विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्या दृष्टीनेही सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाची ठरणार आहे. पुढील काळात टप्प्याटप्प्याने शंभर टक्के डिजिटाईज्ड



होण्याचा विद्यापीठाचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक पी.एस. रेड्डी म्हणाले, महाराष्ट्रातल्या अग्रगण्य अशा शिवाजी विद्यापीठाशी जोडले जाण्याचा आनंद मोठा आहे. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी यावेळी सदर सामंजस्य कराराचे स्वरुप व महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, केंद्र सरकारच्या 'डीजीटल इंडिया' उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षांत प्रमाणपत्रे याबाबतची माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सदर माहिती त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकतील. प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील.

या सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर सीडीएसएलकडून रेड्डी यांनी स्वाक्षरी केल्या. या प्रसंगी कंपनीचे इन्स्टिट्यूशनल बिझनेस हेड सुधीर सरकार, इन्व्हेस्टर एज्युकेशन हेड अजित मंजुरे, कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव आर.डी. सावंत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, डॉ. मिलिंद जोशी यांच्यासह परीक्षा विभागातील अधिकारी व प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

22 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# कृषी क्षेत्रातील नोटाबंदीचा फटका शासनाने भरून काढावा

## डॉ. जे. एफ. पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नोटाबंदीचा कृषी क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राला नोटाबंदीचा फटका सरकारने येत्या अर्थसंकल्पात विविध योजनांच्या माध्यमातून भरून काढावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभाग बँक ऑफ इंडिया चेअर इन रुरल बँकिंग यांच्या संयुक्त विद्यमाने 'केंद्रीय अर्थसंकल्प'या विषयावरील एक दिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. या कार्यशाळेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'केंद्रीय अर्थसंकल्प' या विषयावरील एक दिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत डॉ. जे. एफ. पाटील, सुरेंद्रकुमार जैन, डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. भारती पाटील, डॉ. एम. एस. देशमुख.

डॉ. पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखे आक्रमक नेतृत्व देशाला लाभले आहे. त्यामुळे लोकांच्या शंकांचे किती निरसन होईल, याविषयी शासनासमोर आव्हान आहे. शासन नवीन कायतरी करते असे कायम भासवण्याचा प्रयत्न आहे. सध्या प्लॅनिंग कमिशनचे नाव बदलून निती आयोग असे नामकरण केले आहे. भाववाढ कमी झाल्याचे दिसत आहे. पण नोटाबंदीचा कृषी विभागाला मोठा तोटा झाला आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजनामधून अनुदान द्यावे.

शिरोली मनुफॅक्टरएस असोसिएशनचे सुरेंद्रकुमार जैन म्हणाले, देशातील सकारात्मक बदल बळकट करणारे अंदाजपत्रक असावे.

राज्यशास्त्र विभागातील डॉ. भारती पाटील म्हणाल्या, महिला कामगारांसाठी विशेष तरतूद करण्यात यावी. यावेळी विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. के. व्ही. मारूळकर, उदय गायकवाड, सागर मुळे, प्रा. कविता वड्राले, प्रा. संतोष सुतार, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2017

सकाळ

# गोखले महाविद्यालयात आज रोजगार मेळावा

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठातील विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता माहिती, मार्गदर्शन केंद्र, गोखले महाविद्यालयातर्फे उद्या (ता. २२) कौशल्य आणि रोजगार मेळावा होणार आहे. गोखले महाविद्यालयात सकाळी दहा ते सायंकाळी चार वेळेत होईल.

यामध्ये क्रॉसलँड, प्रोटोकॉल लिडस् इन्फोटेक, शुभविवाह मॅट्रीमोनी, फोक्स अँड क्लाऊड, सोक्टास इंडिया, साऊंड कास्टिंग, मंत्री मेटॅलिक्स, राज हिरा टुल्स, अलर्ट सर्व्हिसेस, स्कायलार्क ग्लोबल बीपीओ, डीकेसी एंटरप्रायजेस, एलआयसी ऑफ इंडिया सहभागी होणार आहेत. आठवी, दहावी, बारावी पास, आयटीआय, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, एमसीए, एमबीए, बीई, सीएसई, आयटी, कंपनी सेक्रेटरी पात्रता असणारे विद्यार्थी भरतीसाठी नाव नोंदवू शकतात. पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी www.maharojgar.gov.in संकेतस्थळावर संपर्क साधावा. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रे, बायोडाटा (तीन प्रती), एम्प्लॉयमेंट ऑनलाइन कार्ड आणावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2017
सकाळ

# प्राणिक हीलिंग संस्थेतर्फे आज द्विहृदय ध्यानधारणा शिबिर

कोल्हापूर, ता. २१ : येथील जीएमसीकेएस प्राणिक हीलिंग सेवा संस्थेतर्फे उद्या (ता. २२) द्विहृदय ध्यानधारणा शिबिर होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील पदवीदान समारंभ हॉलमध्ये सकाळी नऊ वाजता शिबिर होणार असून, सर्वांना विनामूल्य प्रवेश असेल. द्विहृदय ध्यानधारणा ही अतिशय सुंदर व शास्त्रोक्त पद्धतीने विकसित केलेली ध्यानपद्धती आहे. मनातील नकारात्मकता पूर्णपणे काढून सकारात्मक विचारांतून मानसिक शांततेसाठी ती अत्यंत उपयुक्त ठरते. मनाची एकाग्रता वाढल्याने शरीरातील ताणतणाव निघून जातात आणि शारीरिक स्वास्थ्यही उत्तम राहते. शिबिरात सोळा वर्षांवरील कुणालाही सहभागी होता येणार आहे. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष किरण सारडा यांनी केले आहे.

22 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य : डॉ. पवार



डॉ. पवार

कोल्हापूर, ता. २१ : इतिहास संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग व राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोडी लिपी माजी विद्यार्थी मागोवा शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे होते. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात शिबिर झाले.

डॉ. पवार म्हणाले, ''इतिहास संशोधकांना मोडी कागदपत्रे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या माध्यमातून संशोधनात मौलिक भर पडू शकते. मोडी अभ्यासकांना त्या त्या काळाचे सामाजिक स्थितीचे भान असणे आवश्यक आहे. शिवकालीन कागदपत्रांचे संशोधन करत असताना डॉ. बापूजी साळुंखे, डॉ. आप्पासाहेब पवार, वा. सी. बेंद्रे अशा ज्येष्ठ संशोधकांचा सहभाग मिळाल्याने इतिहास क्षेत्रामध्ये योगदान देता आले.''

डॉ. मोरे म्हणाले, ''इतिहास विजयाच्या बाजूने लिहिला जातो. यामुळे इतिहास पुनर्लेखनाची गरज निर्माण झाली आहे. यासाठी मोडी दस्तऐवजांची गरज लागते. आजच्या काळात उर्दू, अर्धमागधी, पाली या भाषांचा स्रोत कमी होत चालला आहे. त्यांच्या अभ्यासाला चालना देण्याची गरज असून, ते काम विद्यापीठ करत आहे.'' विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा, राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह राजेयादव, वसंत सिंघण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आर. एस. कुलकर्णी, अशोक सडोलीकर, पीर महमद नवाब, सुनील मोहिते, मनवीर केसरकर, वीरेंद्र सोलापुरे यांच्यासह अनेक मोडी साधक उपस्थित होते. विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले. आदित्य मैंदर्गीकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2017
पुढारी

# 'कौशल्य'वर बजेटच्या ३ टक्के खर्च अपेक्षीत

## शिवाजी विद्यापीठात अर्थसंकल्प पूर्व चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कौशल्य विकासावर अंदाज पत्रकाच्या ३ टक्के खर्चाची तरतूद करायला हवी, अशी अपेक्षा कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्र विभाग व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभाग तसेच बँक ऑफ इंडिया चेअर इन रूरल बँकिंग अंतर्गत 'केंद्रीय अर्थसंकल्प' या विषयावर अर्थसंकल्प पूर्व चर्चासत्र झाले. यावेळी महाराष्ट्र शासनाचे नियोजन विभागाचे माजी सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, भाववाढ ही आपल्या देशात कमी झाली आहे. असे पहावयास मिळत आहे. पण, नोटाबंदीचा कृषी विभागाला मोठा तोटा झाला आहे. तो तोटा शासन अर्थसंकल्पात भरून काढेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. शिरोली मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे सुरेंद्र जैन म्हणाले, देशात सकारात्मक बदल घडत असून ते बळकट करणारे अंदाजपत्रक असेल अशी आशा करण्यास हरकत नाही.

यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ व्ही. बी. ककडे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. के. व्ही. मारूळकर, उदय गायकवाड, सागर मुळे आदी मान्यवरांनी मनोगते व्यक्त केले. प्रा. कविता वड्राळे यांनी सूत्रसंचालन केले.. प्रा संतोष सुतार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात पत्रकारांसाठी मंगळवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या आणि मास कम्युनिकेशन विभागाने युनिसेफबरोबर भागीदारी केली आहे. या भागीदारी अंतर्गत मंगळवार २४ जानेवारी रोजी 'सामाजिक हिंसा आणि शोषण' या विषयावर पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळा होणार आहे. ही कार्यशाळा वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी हॉलमध्ये सकाळी ११ वाजता होणार आहे. या कार्यशाळेसाठी जास्तीत जास्त पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

22 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**अवनि, एकटी संस्थेचा उपक्रम :** आरोग्य रथास गांधी मैदान येथून प्रारंभ

# कचऱ्यांसाठी प्रबोधन रॅली

**कोल्हापूर :** ओला व सुक्या कचऱ्यांचे वर्गीकरण करा, असे जनजागृतीचे फलक आणि संत गाडगेबाबा महाराज, महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी अशा उत्साही वातावरणात अवनि व एकटी संस्थेतर्फे शनिवारी आरोग्य रथ जनजागृती रॅली काढण्यात आली.

महापौर हसिना फरास यांच्या उपस्थितीत गांधी मैदानापासून ओल्या व सुक्या कचऱ्यांचे वर्गीकरण करून दोन वेगवेगळ्या डब्यांना बांधलेली फीत कापून या रॅलीस प्रारंभ झाला.

ओला व सुका कचरा वर्गीकरण करा, अशा आशयाचे फलकांसह संत गाडगेबाबा व महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी सहभागी होते. जिल्हा परिषद व महापालिका शाळेचे विद्यार्थी, तसेच शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे साडेचार हजार विद्यार्थी सहभागी होते. त्यांना प्रमाणपत्रे दिली. रॅली बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड ते पापाची तिकटी, महापालिकामार्गे निघून तिची टाऊन हॉल बागेत सांगता झाली.



कोल्हापुरात शनिवारी अवनि व एकटी संस्थेतर्फे गांधी मैदान येथून महापौर हसिना फरास यांच्या उपस्थितीत शनिवारी आरोग्य रथ रॅली काढली. रॅलीत अनुराधा भोसले, शिवाजी अडूरकर, चंद्रशेखर यादव यांच्यासह नागरिक सहभागी झाले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, अमल महाडिक यांनी खाऊची व्यवस्था केली. रॅलीत अवनिच्या अनुराधा भोसले, उपाध्यक्ष संजय पाटील, सचिव शिवाजी अडुरकर, डॉ. मंजुळा पिशवीकर, डॉ. अमरसिंह रजपूत, जैनुद्दीन पन्हाळकर, मनीषा पोटे, सविता कांबळे, वनिता कांबळे, जयश्री कांबळे, विनायक भोसले, उदय भोसले, रोटरीचे अध्यक्ष चंद्रशेखर यादव, उपशिक्षणाधिकारी मुळे सहभागी झाले. अतिरिक्त आयुक्त पाटणकर यांना निवेदन देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2017
लोकमत

# चित्रशारदा स्पर्धा शनिवारपासून

**कोल्हापूर** : अविरत प्रॉडक्शन व अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या विद्यमाने शनिवारी व रविवारी (दि. २८ व २९) चित्रशारदा या कलात्मक स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती अविरत पन्हाळकर व महामंडळाचे उपाध्यक्ष धनाजी यमकर यांनी शनिवारी पत्रकारांना दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दिग्दर्शक राजदत्त व माजी अध्यक्ष रामदास फुटाणे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होईल. स्क्रीप्ट इट, लाईट युवर सेट आणि ॲक्ट इट या तीन विषयांवर ही स्पर्धा होणार आहे. बक्षीस समारंभापूर्वी अष्टविनायक मेडियो ऑफ एंटरटेनमेंटतर्फे एडिटिंग, व्ही. एफ. एक्स, डबिंग अशा पोस्ट प्रॉडक्शन विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पत्रकार राज काझी, संकलक विजय खोचीकर, दिग्दर्शक कांचन नायक, कलादिग्दर्शक संतोष फुटाणे हे परीक्षक आहेत. माळी चेंबर्स, माळी गल्ली, मंगळवार पेठ येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.